	M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.		महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.	

क्र.मुविम/शाखा के.नि./न.के.प्र./ ३१५७
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक : ३०/०७/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व क.महाविद्यालये,
जिल्हा ठाणे,रायगड,पालघर, मुंबई दक्षिण/पश्चिम/उत्तर.

विषय : फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक/माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेपासून नवीन परीक्षा केंद्र सुरु करावयाचे असल्यास प्रस्ताव सादर करणेबाबत...

संदर्भ : राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं/परीक्षा-८/३८६५ दि. २३.०७.२०१९

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र मिळण्यासाठी मंडळाच्या विहीत नमुन्यात प्रस्ताव दि.३१/०८/२०२५ पर्यंत हस्तपोच सादर करावा. याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात नवीन परीक्षा केंद्र सुरू करावयाचे आहे त्यांनी प्रथम प्रस्ताव फॉर्मची मंडळाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात यावी व फॉर्म फी रू. १०००/- (रू. एक हजार फक्त) मंडळामध्ये भरून प्रस्ताव फॉर्म विकत घेण्यात यावा.

नवीन परीक्षा केंद्राचा प्रस्तावासोबत खालील बाबींची पूर्तता करून त्याबाबतची सर्व कागदपत्रे व प्रपत्रे जोडावीत.

१. नवीन परीक्षा केंद्राची मागणी करणाऱ्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षा केंद्र घेणेबाबत पालक, शिक्षक, व्यवस्थापन समितीचा ठराव सादर करण्यात यावा. तसेच ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आपल्या केंद्रास जोडावयाचा आहेत. त्याबाबत त्यांचाही पी.टी.ए.चा ठराव सादर करण्यात यावा.
२. ज्या संस्था किंवा शाळा/कनिष्ठ महाविद्यालये आपल्या परीक्षा केंद्रास संलग्न होणार आहेत अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे संमतीपत्र व हमीपत्र रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेणे अत्यावश्यक आहे. रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रस्तावासोबत सादर करावयाचा हमीपत्राचा नमूना प्रस्तावासोबत जोडलेला आहे.
३. प्रस्तावित नवीन केंद्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जनरेटर व इतर सर्व भौतिक सोईसुविधा असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे हमीपत्र स्वतंत्र सादर करण्यात यावे. तसेच गुगल मॅपवर तालुक्याचा नकाशा सादर करण्यात यावा.
४. नवीन परीक्षा केंद्रावर समाविष्ट होणाऱ्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या कमीत कमी २ व त्या एकाच संस्थेच्या नसाव्यात. नवीन मान्यता मिळालेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास दोन वर्षापर्यंत परीक्षा केंद्र घेता येणार नाही.
५. नवीन परीक्षा केंद्र निर्माण केल्यास मूळ परीक्षा केंद्रावरील विद्यार्थी संख्येवर परिणाम होत नसल्याबाबत मूळ केंद्राचे (मुख्याध्यापक/प्राचार्य) हमीपत्र व नाहरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६. गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी (माध्य.)ठाणे/रायगड/पालघर,शिक्षण निरिक्षक दक्षिण/पश्चिम/उत्तर यांचे स्वतंत्र लेखी अभिप्राय व शिफारस सादर करणे.
७. नवीन परीक्षा केंद्रावर इयत्ता १० वी शहरी भागासाठी २५०, ग्रामीण भागासाठी २०० व अतिदुर्गम भागासाठी १२५ ते त्यापुढील संख्येत विद्यार्थी प्रविष्ठ होणे आवश्यक आहे.
८. नवीन परीक्षा केंद्रावर इयत्ता १२ वी शहरी भागासाठी ३००, ग्रामीण भागासाठी २५० व अतिदुर्गम भागासाठी १५० ते त्यापुढील संख्येत विद्यार्थी प्रविष्ट होणे आवश्यक आहे.
९. केंद्र प्रस्तावासोबत ना परतावा छाननी शुल्क रू. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त) **RTGS / NEFT** स्वरूपात कार्यालयात जमा करावी व त्याची पावती प्रस्तावासोबत सादर करावी.
१०. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (HSC) करिता नवीन परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाचे छाननी शुल्क रू.१०,०००/- मंडळाचे **Account no 008910210000029 IFSC Code No. BKID0000089** या खात्यावर **NEFT / RTGS** द्वारे आपले कनिष्ठ महाविद्यालयाच्या खात्यातून रक्कम वर्ग करून जमा करावी.
११. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (SSC)करिता नवीन परीक्षा केंद्राच्या प्रस्तावाचे छाननी शुल्क रू.१०,०००/- मंडळाचे **Account No.008910210000028 IFSC Code No. BKID0000089** या खात्यावर **NEFT/ RTGS** द्वारे आपले शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या खात्यातुन रक्कम वर्ग करून व तशी पूर्णतः खात्री करून वर्ग केल्याची मूळ पावती प्रस्तावासोबत सादर करावी.

अपूर्ण प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. तसेच सदर प्रस्ताव या कार्यालयास विनाविलंब दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत हस्तपोच पाठवावेत. तरी नवीन केंद्र निर्मितीचा प्रस्ताव विहीत दिनांकापर्यंत सादर करावा म्हणजे पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल याची कृपया नोंद घ्यावी. मुदतीनंतर येणारा प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

प्रत माहीतीस्तव :-

१. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे.
२. शिक्षण उपसंचालक,मुंबई विभाग,मुंबई.
३. शिक्षणाधिकारी (माध्य.)ठाणे/रायगड/पालघर, शिक्षण निरिक्षक दक्षिण/उत्तर/मुंबई.
४. लेखा शाखा.